# INTERNATIONAL INDIAN SCHOOL, DAMMAM.
## SUMMATIVE ASSESSMENT - II (MARCH - 2016)
## SUBJECT: MARATHI

**CLASS - VIII** | **MAX.MARKS - 90**
**TIME - 3HRS**

**Instructions:**

1. **Read the questions carefully and attempt all.**
2. **Read your paper thoroughly before Submission.**

---

**1. योग्य पर्याय निवडून खालील रिकामी जागा भरा:** **10mks**

१] तब्येतीने लठ्ठभारती झालेला --------------------. [ शिष्य , गुरु ]
२] ---------------- जाण्याचा अधिकार माझा आहे. [ फासावर , गावात ]
३] यंदा पाऊस पडला---------------- पिके बरी आली. [ म्हणून / किंवा ]
४] "विलक्षण पैज "ह्या धड्याचे लेखक ------------------- [ प्रकाश फडणीस / केशव फडणीस ]
५] " मजबूत " ह्या शब्दाचा अर्थ कवितेतील शब्द ----------------. [ बाहू / बळकट ]
६] " अंधेर नगरी , ---------------- राजा '. [ हुशार / बेबंद ]
७] " मुक्काम " या शब्दाचे दुसरे शब्द . ------------------ [ रहिवास / वृत्ती ]
८] टेबलाखाली याचे सामान्यरूप ------------------- [ टेबल / खाली ]
९] त्या जागेवर फक्त पाणीच उरेल.------------------ [ भूतकाळ / भविष्य काळ ]
१०] [विधाता / विदाता ] अचूक शब्द लिहा.---------------

**2. समानार्थी शब्द: (any 6)** **3mks**

१] भाग्य २] मुद्रा ३] नौका ४] अधिकार ५] जल ६] श्रम ७] हुकूम

**3. विरुध्दार्थी शब्द: ( any 6)** **3mks**

१] कच्चा २] स्मरण ३] अभंग ४] दुर्जन ५] कृपा ६] उपस्थित ७] इमान

**4. लिंग बदला: ( any 4)** **2mks**

१]गृहस्थ २] काका ३] राजा ४] बायको ५] बैल ६] शिष्य

**5. वचन बदला : ( any 6)** **3mks**

१] पाहुणा २] भांडी ३] खडडा ४] दुकान ५] रथ ६] नाते ७] वस्तू

6. **योग्य विरामचिन्हे घालून वाक्य पुन्हा लिहा:** **2mks**

१] तो म्हणाला महोद्य अमृत थोडं महाग आहे
२] हरिदत्त बायकोला म्हणतो अग तुजा पाहुणा निघाला आहे

7. **खालील वाक्यप्रचारांचा योग्य अर्थ वाक्यात उपयोग करुन वाक्य पून्हा लिहा:** **4mks**

१]स्नेहसंमेलनाला प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेल्या पाहुण्यांचा मुख्याध्यापकांनी व्यवस्थित **पाहुणचार केला**.
२] राजूच्या दररोजच्या खोड्यांनी त्याची ताई **हैराण झाली.**
३] रात्रंदिवस **घाम गाळून** शेतकरी धान्य पिकवतो.
४] दोन दिवस सतत पाऊस आज अचानक **गायब झाला.**

8. **अ] खालील वाक्यांतील अधोरेखित शब्दांच्या जाती ओळखा:** **6mks**

१] अभ्यासानंतर खेळतो.
२] शाबास! असेच यश तुला सतत मिळत राहो.
३] मी घरी गेलो पण आई घरी नव्हती.
४] तो मुलगा सावकाश चालतो.
५] उदया शाळेला सुट्टी आहे.
६] ही गोष्ट प्रसिद्ध आहे.

**ब] खालील दिलेल्या शब्दाचे मूळ शब्द व सामान्यरूप लिहा:** **2mks**

१] घराबाहेर २] फळ्याजवळ ३] माझ्यासारखा ४] झाडाखाली

9. **खालील शब्दांचे अर्थ लिहा: ( any 4)** **4mks**

१] जगन्नाथ २] मानुसकी ३] पैज ४] लोटांगणे घालणे ५] विलक्षण ६] यथेच्छ

10. **रिकाम्या जागी योग्य शब्द भरा:** **2mks**

१] गुरूने शिष्याला ---------------------- आणण्यासाठी बाजारात पाठवले.
२] श्रमगंगेच्या तीरावर ---------------------- वस्ती आहे.
३] लोटाभर अमृताला -------------------- सुवर्णमुद्रा पडतात.
४] लालजी काही कच्चा गुरूचा --------------- नव्हता.

11. **खालील वाक्ये योग्य क्रमाने लिहा:** **2mks**

१] रामोजी लालजीकडे अमृत मागितले.
२] रामोजी लालपूर गावात आला.
३] लालजीने रामोजीला लोटाभर पाणी दिले.
४] गावकर्याने रामोजीला लालजीचे दुकान दाखवले

**12. कोण, कोणाला म्हणाले, ते लिह:** **4mks**

१] " आता मला सांगा, अमृत प्यायल्यानंतर काय वाटतं?"
२] " आज फासावर चढणार्याला स्वर्गलाभ होणार."
३] " काय ? तुमच्याकडे अमृत आहे?"
४] "आता लवकर पळू या."

**13. एका वाक्यात उत्तर लिहा: (any 8 )** **8mks**

१] "आभाळाची आम्ही लेकरे" असे कोणाबद्दल म्हटले आहे?
२] 'बादरायण संबंध' म्हणजे काय?
३] रामोजीच्या मनाला कोणती गोष्ट पटली नाही?
४] हरिदत्तच्या घरी कोणाचा पाहुणचार झाला?
५] माणुसकीचे नाते कसे आहे?
७] रामोजीनी लालजीकडे कोणती वस्तू विकत मागितली?
८] कष्टक-यांची वस्ती कोठे आहे ?
९] शब्दांनी व्यक्त होणारा अर्थ कशाच्या साहाय्याने अधिक परिणामकारक व्यक्त होऊ शकतो?

**14. थोडक्यात उत्तरे लिहा:( any 2)** **6mks**

१] चतुरकाने हरिदत्ताशी जवळचा संबंध कसा जोडला?
२] माणुसकीचे अभंग नाते,आम्हीच अमुचे भाग्यविधाते
पंथ वेगळा नाही आम्हा संत वेगळा नाही. ( ओळींचा अर्थ तुमच्या शब्दांत लिहा)
३] गाववाल्याने मुद्रा घेण्याचे का नाकारले?

**15. खालील काव्यपंक्तीचा संदर्भ साहित स्पष्टीकरण करा.** **4mks**

१] आभाळाची आम्ही लेकरे,काळी माती आई
जात वेगळी नाही आम्हा धर्म वेगळा नाही.

**16. कथा लेखन:** **5mks**

मुध्दे: एक सिंह --------- दमला होता-------- झाडाखाली झोपला ------- उंदीर खेलत ------- अंगावर----- उड्या मारू -------- झोपमोड झाली ---------- राग आला------- दुर्लक्ष केले------- त्रास देऊ लागला, उंदराला पकडले-----------उंदीर घाबरला ---------- महाराज मला माफ करा------- मदत करीन------ सिंह हसू -------- काय मदत करणार-----शिकारी--------- जाळे लावले ---------- बाहेर पडला------ डरकाळी ऐकली ------- जाळे कुरतडले----------- आभार मानले.

**17. खालील उतरा वाचून त्याखालील प्रश्नांचे उत्तरे लिहा:** **5mks**

गांधीजींचा जन्म ऑक्टोबर २, इ.स. १८६९ या दिवशी सध्याच्या गुजरातमधील पोरबंदर शहरात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव करमचंद आणि आईचे नाव पुतळीबाई होते. करमचंद गांधी तत्कालीन काठेवाड प्रांतातील पोरबंदरमध्ये दिवाण होते. त्यांच्याआजोबांचे नाव उत्तमचंद गांधी असे होते. करमचंद हिंदु मोध समाजातील होते तर पुतळीबाई वैष्णणव समाजातील. अत्यंत धार्मिक वातावरणातील बालपणाचा मोठा प्रभाव गांधीजींच्या पुढील आयुष्यावर दिसून येतो. विशेषत: अहिंसा, शाकाहार, सहिष्णुता, इतरांबद्दल करुणा या तत्त्वांचे बीज याच काळात रोवले गेले. प्राचीन वांग्मय यातील श्रावणबाळ आणि हरिश्चंद्र या दोन कथांचा मोहनदासचा मनावर गहिरा परिणाम होता.

प्र१] गांधीजींचा जन्म कधी झाला ?
प्र२] गांधीजींच्या आई- वडिलांचे नाव काय?
प्र३] गांधीजींच्या आजोबांचे नाव काय ?
प्र४] गांधीजींवर कोणत्या तत्तवांचे बीज रोवले गेले?
प्र५] वरील उताऱ्याला योग्य नाव दया ?

**18. खालील उतरा वाचून त्याखालील प्रश्नांचे उत्तरे लिहा:** **5mks**

कर्तव्याला विमुख आळशी
त्यांच्या हृदयी हाणित घण
काळ - एक ! गातो अपुल्याशी-
' आला क्षण - गेला क्षण !'

लवाजम्याचे हत्ती झुलती
लक्ष त्याकडे देती कोण,
मित रव जर हे सावध करिती-
' आला क्षण - गेला क्षण !'

प्र१] घड्याळ आपल्याला नेहमी काय सांगत असतो?
प्र२] घड्याळ कोणाच्या हृदयावर घाव घालतो?
प्र३] कोणाकडे लक्ष देऊ नये, असे कवी म्हणतात?
प्र४) मित रवाने आपणास कोण सावध करतो?
प्र५) खालील शब्दाचे अर्थ लिहा:
अ] पाठ फिरवणारा - ---------------आ] फौजफाट्यासह - ------------

**19. खालील उतरा वाचून त्याखालील प्रश्नांचे उत्तरे लिहा:** **5mks**

वाचनाची मला गोडी लागली ती लहाणपणी आईने सांगितलेल्या गोष्टींतून.झोपताना मला व माझ्या धाकट्या भावाला गोष्टी सांगत असे.वडिलांनी पुस्तके आणली.त्यांतील गोष्टी ती वाचून दाखवत असे.'ग्रिम्स फेअरी टेल्य' , मार्क ट्वेनचे ' द प्रिन्स अण्ड द पापर', डिकन्सची 'डेव्हिड कापरफील्ड' व आलिव्हर ट्विस्ट.... .असे कितीतरी खजिने प्रथम आईच्या तोंडून आमच्यापुढे आले. माझ्या वडिलांना पुस्तके जमवण्याची,संग्रह ठेवून पुन्हा पुन्हा वाचण्याची हौस.

प्र१] लेखकाला वाचनाची गोडी कश्यामुळे लागली?
प्र२] झोपताना आई काय सांगत असे?
प्र३] आईच्या तोंडून कोण कोणती पुस्तके लेखकाच्यापुढे आली ?
प्र४] लेखकाच्या वडिलांना कशाची हौस होती ?
प्र५] विरोधी शब्द लिहा : थोरला x -----------------
वचन बदला : पुस्तके - -----------------

**20. पत्र लेकन:** **5mks**

"तुम्हांला हव्या असलेल्या पुस्तकाची मागणी करणारे पत्र पुस्तक विक्रेत्याला लिहा".

XXXXXXXXXXXXXXXXXXXX